# धनवान मूर्खाची कथा

तवा समुदायांतून कोणत्या एकानं त्याले म्हणलं,हे गुरुजी मले माह्याल्या बापाच्या संपत्तीतून वाटा मीडावं म्हणून माह्याल्या भावाले सांगा.तवा त्यानं त्याले म्हणलं,हे माणसां कोणं मले तुमचां न्याय करणारा कोणं नियुक्त केलं हाय?.आजूक त्यानं त्यालें म्हणलं, चौकस रायजाकं,अन् सर्व्या प्रकारच्या लोभा पासून दूर रायजाकं, कावून कि कोणाचं जीवन त्याची संपत्ती असते असं नाई. तवा त्यानं त्यालें कथा सांगतली,कि कोण्याएकां धनवान माणसाच्या जमिनीत लय पीकं आले.तवा तो आपल्या मनांत विचार करून रायला,अन् म्हणें, म्या काय करू?,कावून कि माह्याल्या अति जागा नाई,जती आपलं पीक ठेवू.मंग त्यानं म्हणलं,म्या हे करतो,म्या आपल्या कोठाऱ्या मोडून त्याच्याहून मोठी बांदिन.अन् तती आपलं सर्व अन्न धान्य मालमत्ता ठेवीनं, अन् आपल्या जिवाले मनीन,हे जिवा,तुह्या पासी लय वर्षासाठी बऱ्याचं मालं ठेवला हाय,तू आराम घे खाऊन पिऊन सुखानं राय.पण देवानं त्यालें म्हतलं,अरे मुर्खा,याचं राती तुह्या जीव तुह्यापासून घेतला जाईन,अन् त्या जे धन एकत्र केलं हाय मंग ते कोणाचं होईन? आसाचं तो माणूस पण हाय, जो आपल्या साठी धन एकत्र करते,पण देवाच्या नजरीत धनी नसते.